'एनआयए'कडून यादी जाहीर : पोलिसांनी केले सतर्कतेचे आवाहन

४३ गँगस्टरपैकी काही नांदेडात आश्रयाला येण्याची शक्यता !

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : राष्ट्रीय तपास यंत्रणेने देशभरातील ४३ कुख्यात गँगस्टर यादी जाहीर केली आहे. या यादीतील अनेकजण यापूर्वी नांदेडला येऊन गेले असू शकतात. सध्या हे सर्व गँगस्टर फरार असून ते नांदेडातंही आश्रय घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी सतर्क रहावे. अनोळखी व्यक्ती किंवा संशयास्पद काही आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क करावा असे आवाहन पोलिस दलाकडून करण्यात आले आहे.

पंजाबमध्ये गुन्हे केल्यानंतर अनेक कुख्यात आरोपींनी नांदेडला आश्रय घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे पोलिसांच्या या इशाऱ्याचे विशेष महत्व आहे. खलिस्तानी समर्थक निज्जर याची कॅनडात हत्या झाल्यानंतर त्या देशाच्या पंतप्रधानाने भारतावर आरोप केले. त्यामुळे दोन देशातील संबंध बिघडले. तर दुसरीकडे राष्ट्रीय तपास यंत्रणेने देशातील अनेक राज्यात खलिस्तानी समर्थकांवर कारवाईचा फास आवळण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या मालमत्ता जप्त करण्यात येत आहेत. तसेच त्यांची हिटलिस्ट ही तयार करण्यात आली आहे. त्याचबरोबर कुख्यात गँगस्टर असलेल्या ४३ जणांची यादीही एनआयएने जाहीर केली आहे. हे सर्व गँगस्टर सध्या फरार आहेत. त्यांच्यावर एनआयएने बक्षीस ही जाहीर केले आहे. हे आरोपी देशातील कोणत्याही राज्यात, शहरात आश्रय घेण्याची शक्यता आहे.

नांदेड शहर हे धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. याठिकाणी देश-विदेशातील भाविक मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. त्यामुळे संशयित म्हणून जाहीर केलेले हे गुन्हेगार जिल्ह्यात व शहरात आश्रय घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व हॉटेल, लॉजेस, ढाबे, यात्री निवास, डेरे, सराय, आश्रमशाळा तसेच भाडेकरुसाठी खासगी निवासस्थाने पुरविणारे याठिकाणी आपली ओळख लपवून ते राहू शकतात. त्यासाठी अनोळखी व्यक्तीची ओळख पटवून त्यांना आश्रय द्यावा.

तसेच लॉजेस व हॉटेल चालकांनी त्यांच्या राहण्याबाबतच्या सर्व नोंदी रजिस्टरला ओळखपत्रासह येऊन अद्ययावत ठेवावी. त्याची संपूर्ण माहिती संबंधित पोलिस स्टेशनला द्यावी असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

'रिंदा'मुळे नांदेड 'रडार'वर

- दहशतवादी हरविंदरसिंघ रिंदा हा नांदेडात अनेक वर्ष वास्तव्यास होता. त्याने याठिकाणी खंडणीसाठी अनेकांना धमकाविले, काही जणांवर गोळीबारही केला. बियाणीच्या हत्येचा मुख्य सूत्रधार ही तो आहे.
- तसेच सीमेपलीकडून रिंदाच्या सहकाऱ्यांनी देशात शस्त्रे आणली होती. रिंदाचे अनेक साथीदारही आज नांदेडात आहेत. तर दुसरीकडे पंजाबमध्ये गंभीर गुन्हे करणारे आरोपी नांदेडात आश्रय घेतात.